सहायक वनसंरक्षक यांच्या बदल्या व नियुक्त्या...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग, मंत्रालय,
शासन आदेश क्रमांक : एमएफएस-२०१७/प्र.क्र.८०/फ-८.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :- १) प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांचे पत्र क्र.मवसे/बदली-२०१७/ प्र.क्र.११/२०११/कक्ष-९, दि.१६/१०/२०१७.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांचे पत्र क्र.मवसे/वैन/डीएसटे/ प्र.क्र.१९२७/कक्ष-९, दि.०९/१०/२०१७.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने वन विभागातील सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीने नियुक्त्या / पदस्थापनेत बदल खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे :-

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व सद्याची पदस्थापना	बदलीनंतरची पदस्थापना	अभिप्राय
१	**श्री. एस. ए. पार्डीकर,** सहायक वनसंरक्षक (वन्यजीव), अकोट	सहायक वनसंरक्षक (वने), अकोला	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार श्री.एस.डी.सोनवणे यांच्या दि. ३०/११/१७ रोजी सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदी. (विनंतीनुसार)
२	**श्री. बी. एन. पायघन,** सहायक संचालक, सामाजिक वनीकरण, अमरावती	सहा. वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव), पुसद, जिल्हा यवतमाळ (रिक्त पदावर)	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी. (विनंतीनुसार)
३	**श्री. त्र्यंबक लिंलाजी बिन्नर,** सहायक संचालक, सामाजिक वनीकरण, वनवृत्त नाशिक	उपसंचालक, दादासाहेब चौधरी, वन प्रशिक्षण संस्था, पाल, जि.जळगाव (रिक्त पदावर)	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी. (विनंतीनुसार)
४	**श्री.डी. एस. टेकाडे,** सहायक वनसंरक्षक (कार्य आयोजना), अमरावती	सहायक वनसंरक्षक (मालमत्ता अधिकारी) प्र.मु.व.सं. (वनबल प्रमुख), नागपूर यांचे कार्यालय.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी. (प्रशासकीय कारणास्तव)
५	**श्री.लीमचंद मन्नु राठोड,** सहायक वनसंरक्षक (वन्यजीव), प्र.मु.व.सं. वन्यजीव, नागपूर यांचे कार्यालय	सहायक वनसंरक्षक (मुल्यांकन-२) औरंगाबाद	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी. (विनंतीनुसार)

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व सद्याची पदस्थापना	बदलीनंतरची पदस्थापना	अभिप्राय
६	**श्री.दिगंबर मनोहर दहिबावकर,** सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, नाशिक	सहायक संचालक, वन प्रशिक्षण विद्यालय, शहापूर	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार रिक्त पदी. (विनंतीनुसार)

२. उपरोक्त अधिकाऱ्यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदांवर अन्य अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. सदर नियुक्ती / पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

४. संबंधित अधिकाऱ्यांना शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

५. सदरहू बदली आदेशानुसार संबधित अधिकारी तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७११२३१५३३५९६११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Atul Ashok Kode
Date: 2017.11.23 15:49:13 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर/ औरंगाबाद / ठाणे / अमरावती / यवतमाळ / नाशिक.
७. महालेखापाल,महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र २, नागपूर
८. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, नागपूर/ औरंगाबाद / ठाणे / अमरावती /अकोला/ यवतमाळ / नाशिक / जळगांव
९. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१०.मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
११.सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१२.संबंधित अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत
१३.वन विभागातील सर्व कार्यासने
१४.निवड नस्ती (फ-८ कार्यासन).